दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ | बीड महाराष्ट्र | बुधवार, 28 ऑक्टोबर 2026 | अंक क्र. 164 | वर्षे 4 थे | मुल्य 3 रुपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

# ऊसतोडणी कामगारांच्या मागण्यांसाठी आ. सुरेश धस यांचा पुढाकार

## साखर संघाच्या व्यवस्थापकीय संचालकांची भेट; ४ नोव्हेंबरपर्यंत बैठक घेण्याचे आश्वासन

**आष्टी (प्रतिनिधी)**

राज्यातील ऊसतोडणी कामगार, मुकादम आणि ऊसवाहतूकदारांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी आ. सुरेश धस यांच्या पुढाकाराने मुंबई येथील साखर संघाच्या कार्यालयात साखर संघाचे व्यवस्थापकीय संचालक मा. खताळ साहेब यांची भेट घेण्यात आली. यावेळी कामगारांच्या विविध न्याय्य मागण्यांचे निवेदन सादर करून त्यावर तातडीने सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.

ऊसतोडणी कामगारांची मजुरी प्रतिटन ८०० रुपये करावी, ऊसवाहतूक दरात १०० टक्के वाढ करावी, मुकादमांच्या कमिशनमध्ये ३५ टक्के वाढ करावी, तसेच कामगारांच्या प्रश्नांसाठी त्रिपक्षीय करार करण्यात यावा, अशा प्रमुख मागण्या यावेळी मांडण्यात आल्या. तसेच ऊसतोडणी कामगारांची महामंडळाकडे नोंदणी करून ओळखपत्रे देणे, महामंडळाचा प्रलंबित निधी जमा करणे, संत भगवानबाबा वसतिगृहांची ८० केंद्रे सुरू करणे, पीएफ, ग्रॅच्युइटी, पेन्शन व शिष्यवृत्तीच्या सुविधा उपलब्ध करून देणे, पाच लाख रुपयांचे घरकुल अनुदान देणे, गर्भाशयाच्या शस्त्रक्रिया झालेल्या महिलांना न्याय व नुकसानभरपाई देणे, उचल व थकीत रकमेच्या प्रश्नांवर तोडगा काढणे, सहा महिन्यांचे रेशन उपलब्ध करून देणे, तसेच पाणी, वीज, शौचालय व आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली.

ऊसवाहतूक दरात दर तीन वर्षांनी वाढ करण्यात यावी आणि मुकादमांना खोट्या गुन्ह्यांपासून संरक्षण मिळावे, यासह एकूण १६ महत्त्वपूर्ण मागण्या शासन व साखर उद्योगासमोर मांडण्यात आल्या.या मागण्यांवर सकारात्मक निर्णय न झाल्यास दिवाळीच्या तोंडावर 'कोयता बंद' आंदोलन करण्याचा इशारा संघटनांच्या वतीने देण्यात आला. यावर मा. खताळ साहेब यांनी राज्य शासन व साखर कारखानदारांशी समन्वय साधून ४ नोव्हेंबरपर्यंत बैठक आयोजित करण्याबाबत सकारात्मक भूमिका घेतली.

यावेळी लोकनेते गोपीनाथरावजी साखर कामगार संघटनेचे अध्यक्ष सुखदेव आप्पा सानप, डॉ. डी. एल. कराड (सिटू संघटना, महाराष्ट्र राज्य), संजय तिडके, सुरेश वनवे, भाऊसाहेब आंधळे, कृष्णा तिडके, प्रवीण बांगर, विकास सानप, भरत लवांडे, महादेव दराडे, तुकाराम तिडके, अशोक चोले यांच्यासह विविध कामगार संघटनांचे पदाधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते.

ऊसतोडणी कामगार, मुकादम आणि ऊसवाहतूकदारांच्या न्याय्य हक्कांसाठी आ. सुरेश धस यांनी घेतलेल्या या पुढाकारामुळे आगामी बैठकीत सकारात्मक निर्णय होण्याची अपेक्षा कामगारांमधून व्यक्त होत आहे.



# जायकवाडी धरणातून मादळमोही पंचक्रोशीतील गावांना पाणी द्या!

## पाणीटंचाईच्या प्रश्नावर ३० तारखेला आंदोलन; सरपंच बजरंग सानप यांचे ग्रामस्थांना सहभागी होण्याचे आवाहन

**मादळमोही (प्रतिनिधी)**

बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यासह महाराष्ट्रातील विविध भागांत पाणीटंचाईचे संकट गंभीर होत असताना मादळमोही पंचक्रोशीतील गावांमध्येही पाणीटंचाई तीव्र होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर जायकवाडी धरणातून मादळमोही पंचक्रोशीतील गावांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी येत्या ३० तारखेला आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनात पंचक्रोशीतील सर्व गावांतील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन माजी सरपंच बजरंग सानप यांनी केले आहे.

मादळमोही गटातील कोळगाव, खडकी, गाडेवाडी, तादळा, काजळा, पोखरी, सावरगाव, मादळमोही, कुंभारवाडी आणि मुळुकवाडी यांसह परिसरातील गावांमध्ये पाणीटंचाईचा प्रश्न गंभीर होण्याची शक्यता आहे. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासनाने वेळीच ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे.

दरम्यान, जायकवाडी धरणातून शिरूर शहरासाठी पाणीपुरवठा करण्यात येणार असल्याच्या पार्श्वभूमीवर मादळमोही पंचक्रोशीतील गावांचाही पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्राधान्याने सोडवावा, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.



सरकार आणि प्रशासनाने या प्रश्नाची गांभीर्याने दखल घ्यावी, मादळमोही पंचक्रोशीतील गावांसाठी पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करावे आणि नागरिकांना दिलासा द्यावा, अशी मागणी बजरंग सानप यांनी केली आहे.

पाणी हा नागरिकांच्या जीवनाशी निगडित अत्यंत महत्त्वाचा प्रश्न असल्याने येत्या ३० तारखेला होणाऱ्या आंदोलनात सर्व गावांतील ग्रामस्थांनी एकजुटीने सहभागी व्हावे, असे आवाहनही त्यांनी केले आहे.

# आष्टी–अहिल्यानगर महामार्गावर भीषण अपघात

## बेलगाव फाट्याजवळ भरधाव पिकअपच्या धडकेत तीन शाळकरी मुलांसह पालक गंभीर; आष्टी शहरातील प्रमुख चौकांत गतिरोधक बसविण्याची मागणी

**आष्टी (प्रतिनिधी)**

आष्टी–अहिल्यानगर महामार्गावर बेलगाव फाट्याजवळ भरधाव पिकअपने दुचाकीला दिलेल्या जोरदार धडकेत तीन शाळकरी मुलांसह त्यांचे पालक गंभीर जखमी झाल्याची घटना २७ ऑक्टोबर रोजी दुपारच्या सुमारास घडली. या भीषण अपघातामुळे महामार्गावरील वाहतुकीचा वेग आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. जखमींना तातडीने आष्टी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांची प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारांसाठी अहिल्यानगर येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आल्याची माहिती आहे. या घटनेनंतर आष्टी शहरातील प्रमुख चौकांमध्ये गतिरोधक बसवून वाहनांचा वेग नियंत्रित करावा, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, कासारी येथील भोसले कुटुंबातील पालक तीन शाळकरी मुलांना दुचाकीवरून घेऊन जात असताना बेलगाव फाट्याजवळ भरधाव पिकअपने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, दुचाकीवरील मुलांसह पालक गंभीर जखमी झाले. अपघात घडताच परिसरातील नागरिकांनी मदतीसाठी धाव घेत जखमींना रुग्णालयात पोहोचविण्यास सहकार्य केले. या दुर्घटनेमुळे महामार्गावरील वाढता वाहनवेग आणि अपघात रोखण्यासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबत पुन्हा एकदा चिंता व्यक्त होत आहे.

जामखेड ते अहिल्यानगरदरम्यानचा महामार्ग सिमेंट काँक्रिटचा झाल्याने वाहनचालकांना प्रवासासाठी चांगली सुविधा उपलब्ध झाली आहे. मात्र, रस्त्याची चांगली



स्थिती आणि वाहनांचा वाढता वेग यामुळे काही ठिकाणी अपघातांचा धोका निर्माण होत असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. आष्टी शहरात प्रवेश केल्यानंतर अनेक प्रमुख चौकांमध्ये वाहनांची मोठी वर्दळ असते. या परिसरातून शाळकरी मुले, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि पादचाऱ्यांची ये-जा सुरू असते. अशा ठिकाणी वाहनांचा वेग नियंत्रित करण्यासाठी प्रभावी उपाययोजना नसल्यास गंभीर दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शहरातील अहिल्याबाई होळकर चौक, बेलगाव चौक, पंडित नेहरू विद्यालय परिसर, पंचायत समिती कार्यालय, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक, पोलीस स्टेशन परिसर, महादेव चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, माता रमाई चौक आणि तहसील कार्यालय परिसरात गतिरोधक बसविण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. विशेषतः शाळा आणि शासकीय कार्यालयांच्या परिसरात वाहनांचा वेग कमी करण्यासाठी आवश्यक ती व्यवस्था करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. महामार्गावर किरकोळ अपघातांपासून गंभीर दुर्घटनांपर्यंतच्या घटना घडत असल्याने केवळ अपघातानंतर मदतकार्य करण्यापेक्षा अपघात रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांना प्राधान्य देणे गरजेचे बनले आहे.

संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग, महामार्गाशी संबंधित यंत्रणा आणि वाहतूक पोलिसांनी अपघातप्रवण ठिकाणांची संयुक्त पाहणी करून आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. प्रमुख चौकांमध्ये नियमानुसार गतिरोधक, वेगमर्यादेचे फलक, वाहतूक सूचना फलक आणि आवश्यक ठिकाणी वाहतूक नियंत्रणाची व्यवस्था करावी, अशी मागणी होत आहे. रस्त्याचा विकास होत असताना नागरिकांच्या जीविताची सुरक्षितताही तितकीच महत्त्वाची आहे. बेलगाव फाट्याजवळील अपघातातून संबंधित यंत्रणांनी गांभीर्याने धडा घेऊन आष्टी शहरातील प्रमुख चौकांमधील वाहतूक सुरक्षित करण्यासाठी तातडीने पावले उचलावीत, अशी अपेक्षा आष्टीकरांकडून व्यक्त होत आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसचे मोठे फेरबदल:झिशान सिद्दिकींकडे मुंबई अध्यक्षपदाची धुरा, उमेश पाटील राष्ट्रीय मुख्य प्रवक्तेपदी नियुक्त

**मुंबई** | आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसने (अजित पवार गट) पक्ष संघटनेत मोठे आणि धोरणात्मक फेरबदल केले आहेत. मुंबईतील अल्पसंख्याक मतांची गणिते जुळवण्यासाठी युवा नेते झिशान सिद्दिकी यांच्याकडे राष्ट्रवादीच्या 'मुंबई अध्यक्षपदाची' धुरा सोपवण्यात आली आहे. तर, दुसरीकडे विरोधकांना आक्रमकपणे सामोरे जाण्यासाठी पक्षाचे नेते उमेश पाटील यांची थेट 'राष्ट्रीय मुख्य प्रवक्ते' म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

झिशान सिद्दिकींकडे मुंबईची कमानः अल्पसंख्याक समीकरण साधण्याचा प्रयत्न

वांद्रे पूर्वचे आमदार झिशान सिद्दिकी यांनी नुकताच काँग्रेसला रामराम ठोकत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. प्रवेशाच्या काही दिवसांतच त्यांच्यावर मुंबई अध्यक्षपदासारखी अत्यंत महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे. यामागे राष्ट्रवादीची मोठी राजकीय रणनीती असल्याचे मानले जात आहे. आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत पक्षाला बळकट करण्यासाठी आणि विशेषतः मुंबईतील अल्पसंख्याक तसेच तरुण मतदारांना पक्षाकडे आकर्षित करण्यासाठी झिशान सिद्दिकी यांचा चेहरा वापरला जाणार आहे. वांद्रे आणि



परिसरातील त्यांचा जनसंपर्क पाहता, त्यांच्या या नियुक्तीमुळे राष्ट्रवादीला मुंबईत नवसंजीवनी मिळण्याची अपेक्षा पक्षाला आहे.

### ■ उमेश पाटील यांच्याकडे राष्ट्रीय प्रवक्तेपद

दुसरीकडे, विरोधकांना रोखण्यासाठी आणि पक्षाची भूमिका आक्रमकपणे मांडण्यासाठी राष्ट्रवादीने उमेश पाटील यांची राष्ट्रीय मुख्य प्रवक्ते म्हणून नियुक्ती केली आहे. उमेश पाटील हे अभ्यासू आणि आक्रमक वक्ते म्हणून ओळखले जातात. माध्यमांमध्ये पक्षाची बाजू भक्कमपणे मांडण्यासाठी त्यांच्याकडे ही महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे.

एकीकडे संघटन पातळीवर तरुण आणि अल्पसंख्याक चेहरा पुढे करून मुंबईत पक्षाचा विस्तार करणे आणि दुसरीकडे वैचारिक आघाडीवर विरोधकांना रोखण्यासाठी आक्रमक प्रवक्त्याची नियुक्ती करणे, अशा दुहेरी रणनीतीवर राष्ट्रवादी काँग्रेस सध्या काम करत असल्याचे या दोन मोठ्या नियुक्त्यांवरून स्पष्ट झाले आहे.

# भारत-न्यूझीलंड चौथ्या टी-20 च्या सर्व तिकिटांची विक्री:40 हजार प्रेक्षक उपस्थित राहण्याची अपेक्षा

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातील चौथ्या टी-20 सामन्याची सर्व तिकिटे विकली गेली आहेत. शुक्रवारी ऑकलंडच्या ईडन पार्कवर होणारा सामना पाहण्यासाठी 40 हजारांहून अधिक प्रेक्षक पोहोचण्याची अपेक्षा आहे. न्यूझीलंड क्रिकेटच्या मते, या मैदानावर होणाऱ्या आंतरराष्ट्रीय सामन्यांसाठीची ही तिसरी सर्वाधिक प्रेक्षकसंख्या ठरू शकते.

भारतीय संघाने सुरुवातीचे तिन्ही सामने जिंकून पाच सामन्यांच्या मालिकेत 3-0 अशी अजिंक्य आघाडी घेतली आहे. मालिकेतील आतापर्यंतच्या चार सामन्यांची तिकिटे विकली गेली आहेत. यामध्ये सुरुवातीचे दोन सामने आणि रविवारी हॅमिल्टन येथे होणारा पाचवा T20I सामनाही समाविष्ट आहे.

2019 मधील प्रेक्षकसंख्येचा विक्रम मोडला जाणार

न्यूझीलंड क्रिकेटच्या मते, चौथ्या T20I सामन्यातील प्रेक्षकसंख्या द्विपक्षीय मालिकेतील सामन्यांसाठीचा देशातील विक्रम मोडणार आहे. यापूर्वी 2019 मध्ये ईडन पार्कवर भारताविरुद्ध पुरुष आणि महिला संघांच्या डबल-हेडर सामन्यांवेळी 36,523 प्रेक्षक उपस्थित होते.

न्यूझीलंड क्रिकेटचे मुख्य विपणन आणि व्यावसायिक अधिकारी ग्लेन क्रिचली यांनी सांगितले की, ईडन पार्कमधील खचाखच भरलेल्या स्टेडियममध्ये सामना पाहण्याचा अनुभव खास असतो. त्यांनी सांगितले की, या मालिकेबाबत प्रेक्षकांचा



उत्साह अपेक्षेपेक्षा जास्त आहे. ईडन पार्कमधील सर्व तिकिटे विकली जाणे हे या उत्साहाचे प्रमाण आहे.

ईडन पार्कमध्ये यापेक्षा मोठी गर्दी फक्त 2 वेळा जमली

ईडन पार्कमध्ये आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात यापेक्षा जास्त प्रेक्षक फक्त दोन वेळा उपस्थित होते.

2015 वनडे विश्वचषक उपांत्य सामनाः न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील सामना पाहण्यासाठी 41 हजार प्रेक्षक उपस्थित होते. ग्रांट एलियटच्या षटकाराच्या मदतीने न्यूझीलंडने अंतिम फेरीत प्रवेश केला होता.

# ‘हर घर संत रविदास विचार-विकसित महाराष्ट्र’ विशेष अभियान राज्यात व्यापक स्वरूपात राबवा -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षानिमित्त राज्यस्तरीय मुख्य कार्यक्रम नाशिक येथे होणार





**मुंबई :** संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षानिमित्त नोव्हेंबर २०२६ ते फेब्रुवारी २०२७ या कालावधीत राबविण्यात येणारे ‘हर घर संत रविदास विचार–विकसित महाराष्ट्र’ हे विशेष अभियान राज्यात व्यापक स्वरूपात राबवावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. संत रविदास महाराजांनी मांडलेले मानवता, समता, करुणा आणि दुःखमुक्त समाजाचे विचार तळागाळातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवावेत. त्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने प्रभावी अंमलबजावणी यंत्रणा उभारावी, असे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित विशेष अभियानाच्या आढावा बैठकीत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, आमदार रवींद्र चव्हाण, संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षाचे राज्य समन्वयक रामेश्वर नाईक, सहसमन्वयक रविंद्र राठोड हे उपस्थित होते.

तसेच जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील,वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे आणि बार्टीच्या महासंचालिका डॉ. दीपा मुधोळ-मुंडे यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव व सचिव दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षानिमित्त आयोजित विविध उपक्रमांच्या माध्यमातून व्यापक सामाजिक आणि वैचारिक अभिसरण घडवून आणणे हे अभियानाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. संत रविदास महाराजांनी समता, मानवता, श्रमप्रतिष्ठा आणि सामाजिक न्यायाची शिकवण दिली. हे विचार केवळ कार्यक्रमांपुरते मर्यादित न राहता समाजाच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनावेत, यासाठी प्रयत्न करावेत. संत रविदास महाराजांच्या विचारांवर आधारित हे अभियान समाजातील सर्व घटकांना जोडणारे आणि सामाजिक सलोखा अधिक दृढ करणारे ठरेल.

विविध सामाजिक परंपरांमधील साम्यस्थळे आणि संतविचारांतील एकात्मतेचा संदेश समाजासमोर आणून सामाजिक सलोखा व बंधुभाव अधिक दृढ करण्यासाठी या अभियानाचा उपयोग होईल. ‘हिंद की चादर’ कार्यक्रमाच्या माध्यमातून विविध समाजघटकांना एकत्र आणून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यात आला. त्याच धर्तीवर संत रविदास महाराजांच्या जयंती वर्षानिमित्त आयोजित उपक्रमांतूनही सामाजिक एकतेचा व्यापक संदेश दिला जावा. या अभियानासाठी संबंधित विभागांनी स्वतंत्र अंमलबजावणी यंत्रणा उभारून निर्धारित कार्यक्रम वेळेत पूर्ण करावेत. अभियानाच्या नियोजनापासून प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंतच्या कामांचा सातत्याने आढावा घेण्यासाठी समिती गठित करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

### ■ कुंभमेळ्याच्या माध्यमातून व्यापक जनजागृतीवर भर - मंत्री गिरीश महाजन

जलसंपदा मंत्री गिरीश महाजन म्हणाले की, संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षानिमित्त राज्यस्तरीय मुख्य कार्यक्रम नाशिक येथे होणार आहे. या कुंभमेळ्यात देशभरातून मोठ्या संख्येने भाविक व नागरिक सहभागी होतात. या पार्श्वभूमीवर संत रविदास महाराजांचे विचार आणि त्यांच्या जयंती वर्षानिमित्त राबविण्यात येणाऱ्या अभियानाची माहिती अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविता येईल.कुंभमेळ्यात येणाऱ्या दहा कोटींहून अधिक नागरिकांपर्यंत कमी खर्चात प्रभावीपणे जनजागृती करण्यासाठी विशेष उपक्रम राबविण्याचा प्रस्ताव आहे. व्यापक जनसहभागाच्या माध्यमातून संत रविदास महाराजांच्या विचारांचा प्रसार करणे शक्य होईल, असे त्यांनी नमूद केले.

### ■ समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करणार - मंत्री संजय शिरसाट

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री संजय शिरसाट म्हणाले की, संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षानिमित्त समाजासाठी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना एकत्रितपणे पुरस्कार देऊन सन्मानित करावे. नागपूर विभाग, यवतमाळ तसेच राज्यातील अन्य भागांत सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना विभागनिहाय मर्यादित न ठेवता एकाच व्यासपीठावर सन्मानित करण्याची यामागील संकल्पना आहे. या उपक्रमातून समाजातील सकारात्मक कार्याला प्रोत्साहन मिळेल, असे त्यांनी सांगितले.

### ■ संत रविदास महाराजांच्या नावाने विशेष योजना- मंत्री संजय सावकारे

वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांनी संत रविदास महाराजांच्या नावाने विशेष योजना सुरू करण्याची सूचना मांडली. या योजनेत अनुसूचित जातीतील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती तसेच नव्या क्षेत्रांत काम करणाऱ्या युवकांना आर्थिक सहाय्य देण्याची तरतूद असावी. संत रविदास महाराजांचे साहित्य महाराष्ट्रात अधिक व्यापक स्वरूपात उपलब्ध करून देण्यासाठी त्याचे संकलन, प्रचार आणि प्रसार करण्यासंदर्भात नियोजन करण्यात यावे. अनुसूचित जातीतील युवकांच्या नवकल्पना आणि उद्योजकीय उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी संत रविदास महाराजांच्या नावाने स्वतंत्र निधी किंवा विश्वस्त संस्था स्थापन करून आवश्यक आर्थिक पाठबळ उपलब्ध करून देण्याची सूचनाही त्यांनी मांडली.

### ■ संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षानिमित्त विविध उपक्रम

संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षाचे राज्य समन्वयक रामेश्वर नाईक यांनी प्रास्ताविक केले. संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षाचे सहसमन्वयक रविंद्र राठोड यांनी सादरीकरण करून उपक्रमांची माहिती दिली यामध्ये संत रविदास महाराजांच्या ६५० व्या जयंती वर्षानिमित्त नोव्हेंबर २०२६ ते फेब्रुवारी २०२७ या कालावधीत ‘हर घर संत रविदास विचार–विकसित महाराष्ट्र’ हे विशेष अभियान राबविण्यात येणार आहे.

विविध शासकीय विभाग आणि सामाजिक संस्थांच्या समन्वयातून राबविण्यात येणाऱ्या या अभियानात धार्मिक स्थळे, सामाजिक व स्वयंसेवी संस्था, व्यापारी आणि कामगार संघटना, महिला बचतगट, युवक मंडळे, शासकीय क्षेत्रीय कार्यालये, शैक्षणिक संस्था, महामंडळे आणि आरोग्य संस्थांचा सहभाग घेतला जाणार आहे. राज्य, विभाग, जिल्हा, तालुका, शहर आणि ग्रामस्तरावरील समित्यांच्या माध्यमातून अभियानाची अंमलबजावणी करण्यात येईल.

राज्यातील १ लाख ८ हजार १३९ शाळा, ५ हजार ८४१ महाविद्यालये, ६५ विद्यापीठे आणि ११ हजार १५० सार्वजनिक ग्रंथालयांना या अभियानाशी जोडण्याचे नियोजन आहे. शाळा व महाविद्यालयांमध्ये निबंध, वक्तृत्व, प्रश्नमंजुषा, संतसाहित्य वाचन, संशोधन आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातील. यासोबतच विविध सामाजिक सेवा उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक समता आणि मानवतेच्या मूल्यांची रुजवण केली जाणार आहे.अभियानांतर्गत मोफत आरोग्य तपासणी, रक्तदान शिबिरे, नेत्र व दंत तपासणी, महिला व बाल आरोग्य, पोषण, व्यसनमुक्ती आणि स्वच्छतेविषयी जनजागृती असे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. श्रमाचे महत्व अधोरेखित करण्यासाठी ‘श्रमवीर सन्मान’, कारागिरांच्या उत्पादनांचे प्रदर्शन, महिला आर्थिक स्वावलंबन आणि युवा सेवा सप्ताह यांचे आयोजन केले जाईल.

राज्यातील ६५० गावांमध्ये विचारसभा आणि वृक्षारोपणाचे नियोजन आहे. प्रत्येक जिल्ह्यात दोन प्रचार वाहनांच्या माध्यमातून संत रविदास महाराजांच्या विचारांचा प्रसार केला जाणार आहे. चित्रफिती, पॉडकास्ट, मुलाखती आणि संवादात्मक कार्यक्रमांच्या माध्यमातूनही नागरिकांपर्यंत अभियानाचा संदेश पोहोचविण्यात येईल.डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करण्यासाठी ‘डिजिटल रविदास ६५०’, ई-ग्रंथालय, डिजिटल प्रश्नमंजुषा आणि ६५० प्रेरणादायी व्हिडिओ कथांचा उपक्रम राबविण्यात येणार आहे. विविध प्रसारमाध्यमांच्या माध्यमातून संत रविदास महाराजांचे विचार, सामाजिक समतेचा संदेश आणि अभियानातील उपक्रमांना व्यापक प्रसिद्धी देण्यात येईल.या अभियानाचा राज्यस्तरीय मुख्य कार्यक्रम १३ व १४ फेब्रुवारी २०२७ रोजी नाशिक येथे प्रस्तावित आहे. या कार्यक्रमात बेगमपुरा संकल्पना, संत संगम, सांस्कृतिक कार्यक्रम, समता महामंच, संत रविदास वारसा प्रदर्शन, संवाद केंद्र आणि सामुदायिक अन्नसेवा यांचा समावेश असेल.

मुख्य कार्यक्रमानंतर ‘समाजकुंभ’ उपक्रमाच्या माध्यमातून विविध सामाजिक व धार्मिक परंपरांना एकत्र आणून समता, बंधुता, सामाजिक एकात्मता आणि मानवतेच्या विचारांचा प्रसार करण्यासंदर्भातील नियोजन करण्यात आले.

# मूलांकाचा रिंगटोनवर परिणाम




अंकशास्त्रात मूलकांच्या आधारावर माणसाच्या भविष्याबद्दल जाणून घेऊ शकतो. मूलक अर्थात तुमच्या जन्माचा दिवस. या अंकाचा आमच्या जीवनातच नव्हे तर आमच्या स्वभाव आणि आवडीवर देखील प्रभाव पडतो. मोबाइल आजकाल आमच्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. अशात आम्ही जाणून घेऊ की तुमच्या मूलकासाठी कशी रिंगटोन सूट करेल



- मूलांक 1 असणारे लोक तर्कशाली असतात आणि जीवनात प्रत्येक वस्तू आपल्या हिमतीवर मिळवण्याचा प्रयत्न करतात. म्हणून यांची रिंगटोन जर फिल्मी असेल तर ते गाणे जीवनात पुढे जाण्याची गोष्ट करणारे असतील. यांच्या मोबाइलवर प्रसन्न होणारे, मस्ती आणि जग जिंकणारे गाणे असतील. ज्यांचा मूलांक 1 असेल ते लोक जीवनाचा प्रत्येक क्षण जगतात.
- मूलांक 2 असणारे लोक फारच कोमल हृदयाचे असतात म्हणून त्यांची रिंगटोनदेखील खुशनुमा गाणे असणारी असते. लोकांचे मन जिंकणारे अंक 2 वाले लोक रोमँटिक आणि कॉमेडी गाणे ऐकणे पसंत करतात. यांच्याकडून नेहमी काही शिकण्यासारखं असत म्हणून यांच्या आवडीच्या गाण्यांमध्ये नेहमी नावीन्य
- मूलांक 3 वाले लोक फार रिझर्व टाईपचे असतात म्हणून यांच्याजवळ नेहमी काही यूनिक गाणे ऐकायला मिळतात. स्वतःला नेहमी वेगळे आणि सर्वोत्कृष्ट साबीत करणाऱ्या या लोकांची आवड वेगळी असते.
- ज्या लोकांचा मूलांक 4 असतो ते स्वभावाने आपल्या मस्तीत राहणारे, जगाची पर्वा न करणारे असतात. पण यांची रिंगटोन नेहमी मन जिंकणारी असते. तसेच हे लोक आपली रिंगटोन नेहमी बदलत राहतात कारण कुठल्या एका वस्तूवर टिकून राहणे यांची सवय नसते.
- मूलांक 5 वाले लोक फारच बुद्धिमान असतात. म्हणून यांच्याजवळ गाण्यांचे कलेक्शन फारच छान असतात. रोमँटिकपासून भजनापर्यंत सर्व काही यांच्याजवळ मिळू शकत. यांना हे माहीत असते की कुठले कामे केल्याने यांची हौसपण पूर्ण होईल आणि दुसऱ्यांना वाईटपण वाटणार नाही.
- ज्या लोकांचे मूलांक 6 असतो ते लोक शायराने मिजाज़चे असतात म्हणून यांच्या रिंगटोनमध्ये अशा प्रकारचे गाणे ऐकण्यात येतात ज्यात शब्दांचे वजन जास्ती असेल. म्हणून कोणाच्या रिंगटोनमध्ये एखादी जुनी गझल ऐकण्यात आली तर समजा की तो व्यक्ती प्रत्येक काम मनापासून करणारा असतो.
- मूलांक 7 वाले लोक तुनक मिजाजी असतात म्हणून यांच्या पसंतीचे गाणे लवकर कोणाला पसंत पडत नाही. शक्य आहे की यांच्या रिंगटोनमध्ये एखाद्या चित्रपटाचा डायलॉग असो किंवा चित्रपटातील एखादा घाबरवणारा संवाद. असे लोक व्यवहारात फारच जिद्दी असतात.
- ते लोक ज्यांचा मूलांक 8 आहे ते सर्वांना सोबत घेऊन चालणारे असतात, म्हणून यांची आवड पण साधारण असते. यांच्याजवळ स्लो आणि फास्ट दोन्ही प्रकाराचे गाणे ऐकायला मिळतात. यांची रिंगटोनपण साधारण असते जी वेळेप्रमाणे बदलत असते.
- मूलांक 9 गमती प्रवृत्तीचे असतात, म्हणून यांची रिंगटोन अशी होऊ शकते ज्याला ऐकून माणूस हासल्याविशाय राहू शकत नाही.

# फेंगशुईनुसार असावे दुकान



व्यापार अथवा व्यवसाय अनेक कारणांवर अवलंबून असतो. त्यात विशेष सांगायचे झाल्यास स्वतःचे नशीब, व्यवसायाचे ठिकान (वास्तू) व बाजाराची स्थिती या गोष्टी फार महत्त्वाच्या आहेत. या तीन गोष्टींमध्ये तिसरे कारण हे अस्थायी असून पहिले व दुसरे स्थायी आहेत. बाजारात तेजी- मंदी हे ऋतूचक्रासारखे सुरूच असते. त्यात बदल करणे आपल्या हाती नसते. मात्र व्यवसायाचे ठिकाणात आपल्याला पाहिजे तसा बदल करता येत असतो. व्यवसायात भरभराटी आणण्यासाठी व्यवसायाचे ठिकाण किंवा जागा महत्त्वाची भूमिका बजावत असते.

आपल्या जीवनात वास्तुमुळे येणाऱ्या अडचणी व त्यावरील निदान याविषयी वास्तुशास्त्र व फेंगशुईमध्ये विस्तृत माहिती देण्यात आली आहे. आपले भाग्य आपल्या जन्मवेळेवर निर्धारित असते. फेंगशुईच्या माध्यमातून आपला निवास आणि व्यवसायाचे ठिकाण यांच्यात जर सुधारणा झाली तर आपले भाग्य आपोआप बदलत असते. चीन, जपान, हाँगकाँग आदी दक्षिण-पूर्वी आशियामधील देशातील व्यापार-व्यवसायातील प्रगतीमागे फेंगशुईचे असलेले पाठबळ नाकारता येणार नाही.

- दुकानाचा दरवाजा मोठा असावा. तसेच तो मुख्य रस्त्याकडून उघडणारा असवा. दरवाजा अरूंद गल्लीकडून उघडू नये.




- दुकानाच्या दरवाज्यासमोर स्तंभ, विजेचा खांब, वृक्ष, खंडर, जिना, घराचे किंवा दुकानाचा टोकदार भाग नसावा.
- आपले दुकान जर रस्त्याच्या त्रिफुलीवर असेल तर दुकानाच्या बाहेर एक आरसा अवश्य लावावा.
- दुकानाचे कॅश काऊंटर दरवाज्याला खेटून अथवा समांतर ठेऊ नये.
- दुकानाच्या आतील भिंतींना रंग फेंगशुईनुसार असावा.

# सद्‌भाग्याचे प्रतीक ड्रॅगन



- ड्रॅगन हा उत्तम यांग ऊर्जेचे प्रतीक आहे. ड्रॅगनची प्रतिकृती आपण आपल्या दुकान किंवा कार्यालयात पूर्व दिशेला ठेवून घर अधिक क्रियाशील करू शकता. कारण पूर्व दिशेचा संबंध असाधारण प्राण्याशी निगडित आहे. या दिशेला मूलतत्त्व काष्ठ आहे. त्यामुळे ड्रॅगनची प्रतिकृती लागडावर कोरून ठेवून ती पूर्व दिशेच्या कोपऱ्यात ठेवणे अधिक लाभदायी ठरते. आपण माती किंवा स्फटिकाच्या ड्रॅगनचाही उपयोग करू शकतात.
- ड्रॅगन हा विपुल यांग ऊर्जेचे प्रतीक आहे. त्यामुळे जेथे अधिक यांग ऊर्जेची आवश्यकता असते तेथे लोकांचे खूपच येणे जाणे असते. रेस्टॉरंटस्, दुकाने, डिपार्टमेंटल स्टोअर्स यादी ठिकाणी पूर्व दिशेला ड्रॅगनचे चित्र असणे, व्यवसायाच्या दृष्टीने फायदेशीर असते.
- ड्रॅगनची प्रतिकृती किंवा चित्र आपल्या बेडरूममध्ये ठेवू नये. कारण बेडरूम हे थकलेल्या शरीराला आराम देण्याचे ठिकाण आहे.

# ऑफिसमध्ये प्रमोशन मिळविण्यासाठी...

शाळा, कॉलेजच्या मुलांपासून नोकरी करत असलेले लोकांमध्ये स्वतःला श्रेष्ठ साबीत करण्याचा प्रयत्न सुरू असतो. चांगले मार्क्स मिळवण्यासाठी, चांगला जॉब मिळवण्यासाठी एवढेच नव्हे तर उत्तम जोडीदार मिळवण्यासाठी लोक रेसमध्ये सामील होण्यासाठी तयार असतात. खास करून जॉबबद्दल बोलायचे झाले तर हा एक असा क्षेत्र आहे ज्यात स्पर्धा आपल्या चरमवर आहे. जीवनाचे यश अपयश फक्त आपल्या जॉबच्या स्थितीवर निर्भर करते. तुमचे ऑफिसमध्ये काय स्टेटस आहे आणि तुमचा पगार किती आहे, ह्या दोन्ही गोष्टीपण तुमच्या जीवनात आनंद आणू शकतात आणि त्यापासून दूर देखील जाऊ शकतात.




## लक्ष्य निश्चित करा आणि कार्य चांगल्या प्रकारे करा

असे म्हणणे अनुचित नसेल की बीन मेहनत आणि समर्पणाचे सुनिश्चित प्रकारे प्रमोशनवर विचार करताना तुमची उपेक्षा केली जाईल. वास्तविक लक्ष्य निश्चित करा आणि त्याला मिळवण्याचा प्रयत्न करा.

## आपला मेंटर तयार करा आणि सल्ला घ्या

योग्य माहिती ठेवणाऱ्या एखाद्या वरिष्ठ अधिकारीशी मित्रता करा आणि त्याकडून माहिती मिळवून घ्या की त्यांनी कशा प्रकारे प्रमोशन प्राप्त केले होते आणि शीर्ष प्रबंधन (टॉप मॅनेजमेंट) द्वारे कर्मचारीमधील कोणत्या गोष्टींबद्दल जाणून घ्यायची इच्छा असते. त्यांचे बहुमूल्य फीडबॅकनुसार तुम्ही तुमचे लक्ष्य प्राप्त करू शकता.

## बसण्याची व्यवस्था :

जेव्हा तुम्हाला तुमच्या कार्यस्थळावर बसण्याची जागा देण्यात येते, तर निश्चित करा की ही जागा बीमच्या खाली नसावी आणि तुमची पाठ मुख्य प्रवेश दाराकडे नसावी. बीममुळे सकारात्मक ऊर्जेचा प्रवाह अवरोधित होतो.

## नवीन कौशल प्राप्त करा

तुम्ही कुठे ही काम करत असाल, नवीन कौशल नक्की शिका ज्याने तुम्हाला संगठनाच्या पुढली स्तरावर जाण्यास मदत मिळेल.

## आपल्या कार्यालय /कार्यस्थळाला व्यक्तिगत रूप प्रदान करावे

वर्तमानात कार्यालयांमध्ये कर्मचारी आपल्या कार्यस्थळाची सजावट करू शकतात. तुम्हाला तुमच्या मागच्या भिंतीवर पहाडांची पेंटिंग्स लावायला पाहिजे. ही मदतीची सूचक असते आणि तुमच्या श्रेष्ठ प्रदर्शनात मदत मिळते.

# नोकरी मिळविण्यासाठी व्हाईट लॉकेट

जर तुम्ही नोकरीमुळे परेशान असाल आणि बरेच प्रयत्न केल्यानंतर देखील तुम्हाला नोकरी मिळत नसेल किंवा आत्मविश्वासात कमी आल्यामुळे इंटरव्यूला तुम्ही योग्य प्रकारे फेस करू शकत नसाल तर यासाठी फेंगशुईत काही उपाय सांगण्यात आले आहे. याचे प्रयोग करून तुम्ही यश मिळवू शकता, पण या सोबतच तुम्हाला तुमच्या क्षमतेत वाढ करावी लागणार आहे. फेंगशुईत मुलांच्या भविष्याबद्दल बरेच उपाय सांगण्यात आले आहे. त्यातून एक आहे व्हाईट लॉकेट. हे धारण केल्याने मुलांना परीक्षेत यश मिळेल. तसेच अभ्यासात देखील त्याने मन लागेल.



- जर तुम्हाला मनाप्रमाणे नोकरी लागत नसेल तर तुम्ही गळ्यात पांढरे लॉकेट धारण करा. असे केल्याने तुमच्यातील सकारात्मक ऊर्जा वाढेल. जर गळ्यात स्फटिकाची माळा धारण केली तर तुमचा आभामंडल वेगळाच चमकेल. याला धारण केल्याने आरोग्य विषयक त्रास देखील दूर होईल.
- जर तुम्हाला जास्त राग येत असेल तर हे लॉकेट धारण केल्याने तुम्हाला शांती मिळेल. व्हाईट क्रिस्टलचे हृदयाकार पेंडल युवांसाठी फारच फायदेशीर आहे. हे अभ्यास येणाऱ्या अडचणींना दूर करण्यास मदत करतो. याला धारण केल्याने एकाग्रता आणि आत्मविश्वासात वाढ होते. आजकाल तरुणांमध्ये फाटलेली जींस धारण करण्याचे क्रेझ आहे, पण असे कपडे तुमच्या गुड लकला बॅड लकमध्ये बदलू शकते. घरात कधीही फाटलेले आणि जुने कपडे घालायला नाही पाहिजे. कपड्यांना धुतल्यानंतर नेहमी उन्हात वाळवायला पाहिजे. धुतलेल्या कपड्यांना कधीही रात्री बाहेर नाही सोडायला पाहिजे. रात्री निगेटिव्ह एनर्जी असते, जी कपड्यांमध्ये येते. जेव्हा आम्ही त्या वस्त्रांना धारण करतो तेव्हा याचा प्रभाव आमच्यावर देखील होतो.

# जन्मदिवस आणि 'स्त्री'चा स्वभाव



- ज्योतिष्य शास्त्रानुसार आठवड्यातील प्रत्येक दिवसाचा स्वामी वेगळा ग्रह असतो. त्यामुळे जन्म दिवस, ग्रह स्वामी, आणि नक्षत्रांच्या आधारावर व्यक्तीचा स्वभाव आणि भविष्य बनते. जन्माच्या वारावरून त्या स्त्रीचा स्वभाव सांगता येऊ शकतो.
- सोमवार : ज्या स्त्रीचा जन्म सोमवारी झाला आहे, ती दिसायला खूप सुंदर, हुशार, मधुरभाषी, शांत स्वभावाची, नोकरी करणारी असते. या स्त्रीला सर्व प्रकारचे सुख मिळते.
- मंगळवार : ज्योतिष्य शास्त्रानुसार मंगळवारी जन्मलेली स्त्री कठोर हृदयाची, भांडखोर स्वभावाची, शक्तिशाली असते. या स्त्रिया सहजासहजी कोणावरही दया करत नाहीत.
- बुधवारी : बुधवारी जन्म घेतलेल्या स्त्रियांवर स्वरस्वती देवीची कृपा प्राप्त झालेली असते. यामुळे शिक्षण क्षेत्रात यांना विशेष यश प्राप्त होते. या स्त्रिया दिसायला सुंदर, सद्‌गुणी असतात. त्याचबरोबर या स्त्रिया सर्व कलांमध्ये कुशल असतात.
- गुरुवार : ज्या स्त्रियांचा जन्म गुरुवारी झाला आहे, त्या उच्चशिक्षण घेतात. या स्त्रिया धैर्यवान, शांत स्वभावाच्या, श्रीमंत आणि सर्व सुखांची प्राप्ती करणाऱ्या असतात.
- शुक्रवार : शुक्रवारी जन्म घेतलेल्या स्त्रीचा स्वभाव चंचल असतो. या स्त्रिया हुशार आणि सुंदर असतात. कुटुंब आणि बाहेरील जगामध्ये यांचे वेगळे स्थान असते. या स्त्रियांना मजा-मस्ती करायला खूप आवडते.
- शनिवार : ज्या महिलांचा जन्म शनिवारी झाला आहेत त्या शरीराने सडपातळ व उंच असतात. कधी-कधी या स्त्रिया लावालावी करणाऱ्या असू शकतात.
- रविवार : रविवारी जन्माला येणाऱ्या स्त्रिया चंचल स्वभावाच्या असतात. एखादी गोष्ट आत्ता आवडली असेल तर थोड्याच वेळात ती नावडतीही होऊ शकते.

# नवग्रह शांतीचे उपाय



नवग्रह अतृप्त असल्याने घरातील मुख्य पुरुष तसेच कुटुंबातील सदस्यांना अनेक प्रकारच्या अडचणींना सामोरे जावे लागत असते. नवग्रहांची शांती केल्यास त्या अडचणीतून मुक्त होता येते.

- सूर्य- सूर्याची शांती करण्यासाठी रविवारी दुपारी केवळ दही आणि भाताचे सेवन करावे. 21 कमळ गणपतीला अर्पण करावीत. त्या दिवशी मीठयुक्त पदार्थ खाऊ नये.
- चंद्र- चंद्राची शांती करण्यासाठी 'ॐ नमःशिवाय' या मंत्राचा जप करावा. पांढरे फूल नदी किंवा विहिरीत अर्पण करावे. चांदीच्या भांड्यात पाणी प्यावे. सूर्यास्त झाल्यानंतर दूध पिऊ नये.
- मंगळ- मंगळ ग्रहाची शांती करण्यासाठी मसूरची दाळ व गुळाचे पदार्थ मंगळवारी खावे. गणपतीचे दर्शन घ्यावे.
- बुध- बुध ग्रहाची शांती करण्यासाठी इलायची व तुळशीची पत्ते खावे. इलायची नदीत प्रवाहीत करावी. बुधवारी मुठभर हिरवे मुग दरिद्रीनारायणास दान करावे.
- गुरू- गुरुची शांती करण्यासाठी चमेलीची 12 फूले वाहत्या पाण्यात प्रवाहीत केले पाहिजे. पिवळ्या कन्हेरचे फूल गुरुला अर्पण करावे.
- शुक्र- शुक्र ग्रहाची शांती करण्यासाठी 'ॐ नमः शुक्राय नमः' या मंत्राचा जप करावा. पांढरे फूल पाण्यात प्रवाहीत करावे. गायीला ज्वारी खाऊ घालावी.
- शनि- शनि ग्रहाची शांती करण्यासाठी खोबरेल तेलात कापूर टाकून ते तेल आपल्या केसांना लावावे. काळे उडीद भिखारीला दान करावे. शनिवारी लोखंड किंवा स्टिलच्या भांड्यात नाश्ता किंवा भोजन करू नये.
- राहू- राहूची शांती करण्यासाठी काळे धोतऱ्याचे फूल शिवशंकराला वाहावे. लोखंड अर्थात स्टिलच्या भांड्यात नाश्ता करू नये.



# हाताचा रंग सांगतो व्यक्तिमत्त्व



- ज्योतिषमध्ये हात पाहताना रंगाकडे दुर्लक्ष करू शकत नाही. हाताचा रंग व्यक्तीचा आरसा असतो. मात्र हाताला स्पर्श करून दाबल्याने रंगात परीवर्तन होतो आणि हे रंग परिवर्तन नैसर्गिक जीवनाचे मूल्यांकन करण्यासाठी एक चांगला पर्याय आहे.
- हाताचा रंग गुलाबी असल्यास व्यक्ती निरोगी, प्रेमळ, दयाळू, सभ्य, विनम्र, मेहनती, भावुक, उन्नतिशील, आदर्शवान, व्यावहारिक, इतरांची मदत करणारा असेल.
- हातात काळे डाग असणारा व्यक्ती दुष्ट प्रवृत्तीचा असतो अर्थात तो अपयशी असतो.
- निळ्या रंगाचे हात रक्त विकार, रोगी, जीवनाप्रती निरसतेचा भाव असल्याचे प्रतीक आहे.
- पिवळे हात असलेल्या व्यक्तीत रक्ताची कमी असते. असा व्यक्ती आजारी, मंदबुद्धी, कर्महीन, अस्वस्थ असतो अर्थात त्याला जीवनात अपयशाला समोरा जावे लागते.
- लाल हात असलेला व्यक्ती संतापी, दूरदृष्टी नसणारा, असमंजस, शंकेखोर आणि लहरी असतो. हाताला घाम येणारा व्यक्तीही असाच असतो.
- पांढऱ्या रंगाचे हात असलेल्या व्यक्तीत रक्ताची कमी असू शकते. तसेच शुभ्र पांढरा रंग आध्यात्मिक शक्तीचे प्रतीक आहे.

# जन्मतिथी ठरविते तुमचे करिअर

व्यक्तीचे व्यावसायिक यश त्याचे कर्तृत्व आणि मेहनतीवर अवलंबून असले तरीसुद्धा तुमची जन्मतिथी आणि ऋतू हे घटक देखील तुमचे करिअर निर्धारित करण्यात अत्यंत महत्वाचे असतात. सौडर स्कूल ऑफ बिझीनेस आरि युनिव्हर्सिटी ऑफ ब्रिटिश कोलंबिया या विद्यापीठाच्या संशोधकांनी एका सर्वेक्षणाअंती हा निष्कर्ष काढला आहे. उन्हाळ्यात जन्मणारीमुले कार्पोरेट क्षेत्रात फारशी यशस्वी होत नाहीत. त्यामुळे अशा मुलाकडून सीईओ होण्याची अपेक्षा करणे अयोग्य असल्याचे संशोधकांचे म्हणणे आहे. 500 पेक्षाही अधिक सीईओंचा अभ्यास केल्यानंतर ही बाब संशोधकांच्या ध्यानात आली.




जन्मतिथी आणि ऋतू यांचा मुलांच्या बुद्धिमत्तेवर देखील आमूलाग्र परिणाम होत असल्याचे दिसून आले आहे, पण याचबरोबर प्रचलित शिक्षणपद्धतीचा मुलांच्या व्यावसायिक यशावर अधिक परिणाम होत असल्याचे स्पष्ट झाले. जून आणि जुलैमध्ये जन्मलेली मुले त्यांच्या शालेय जीवनामध्ये अधिक तरुण तर मार्च आणि एप्रिलमध्ये जन्मलेले तुलनेने अधिक प्रौढ आढळून आले आहेत. या नव्या संशोधनामुळे कार्पोरेट जगत आणि ज्योतिषशास्त्र यांचा संबंध स्पष्ट झाल्याचे मत जाणकार व्यक्त करत आहेत, पण अनेकांनी मात्र या संशोधनावर विश्वास ठेवण्यास नकार दिला आहे.

दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

बीड, बुधवार, 28 ऑक्टोबर 2026



## महागावचे विशाल डहाळे यांची फॅशन आणि ब्युटी पेजंट क्षेत्रात उल्लेखनीय वाटचाल; जिल्हाभरातून होत आहे कौतुक!

### महाराष्ट्रासह देशभरात आणि नेपाळमध्ये फॅशन शोचे आयोजन व दिग्दर्शन; 'मिस अँड मिसेस किड्स विदर्भ २०२६' या उपक्रमाची सध्या चर्चा

**महागाव प्रतिनिधी**

यवतमाळ जिल्ह्यातील महागाव येथे गेल्या २० वर्षांपासून वास्तव्यास असलेले विशाल डहाळे यांनी फॅशन शो आणि ब्युटी पेजंट क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. मूळचे आदिलाबाद येथील असलेले विशाल डहाळे हे फॅशन शोचे आयोजन, कोरिओग्राफी आणि दिग्दर्शन या क्षेत्रात कार्यरत असून, त्यांच्या कार्याची जिल्ह्यात चर्चा होत आहे.

विशाल डहाळे यांनी महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर यांसह जयपूर, हैदराबाद, आग्रा, गोरखपूर, महाराजगंज, अहमदाबाद आणि विजयवाडा अशा विविध शहरांमध्ये फॅशन शोच्या माध्यमातून काम केले आहे. तसेच भारताबाहेरील नेपाळ येथेही त्यांनी फॅशन शो क्षेत्रात काम केले आहे. 'मिस इंडिया', 'मिस उर्वशी' आणि 'मिस अर्थ' यांसारख्या ब्युटी पेजंटशी संबंधित कार्यक्रमांमध्येही त्यांनी कोरिओग्राफर आणि दिग्दर्शक म्हणून योगदान दिल्याचे त्यांनी सांगितले.

विशाल डहाळे यांनी आतापर्यंत 'मिस अँड मिसेस महाराष्ट्र' या संकल्पनेअंतर्गत दहा कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. या माध्यमातून नवोदित मॉडेल्सना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, त्यांच्यातील कलागुणांना वाव देणे आणि फॅशन क्षेत्रात पुढे जाण्यासाठी संधी निर्माण करणे, यावर त्यांनी भर दिला आहे.

सध्या त्यांच्या पुढाकारातून 'मिस अँड मिसेस किड्स विदर्भ २०२६' हा ब्युटी पेजंट उपक्रम सुरू आहे. विदर्भातील विविध भागांमध्ये ऑडिशन्स आयोजित करून मुलांना, महिला स्पर्धकांना आणि नवोदित मॉडेल्सना आपले कौशल्य सादर करण्याची संधी दिली जात आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून स्थानिक प्रतिभेला मोठे व्यासपीठ मिळावे, हा आयोजकांचा उद्देश आहे. या स्पर्धेचा ग्रँड फिनाले २० डिसेंबर २०२६ रोजी आयोजित करण्याचे नियोजन आहे.

महागावसारख्या ग्रामीण भागात राहून फॅशन आणि ब्युटी पेजंटसारख्या क्षेत्रात राज्याबाहेर तसेच देशाबाहेर काम करण्याचा अनुभव विशाल डहाळे यांनी मिळवला आहे. त्यांच्या या प्रवासामुळे स्थानिक युवक-युवतींना फॅशन क्षेत्रात करिअर करण्यासाठी प्रेरणा मिळू शकते. आगामी काळातही विविध उपक्रमांच्या माध्यमातून नव्या कलाकारांना संधी देण्याचा त्यांचा प्रयत्न राहणार आहे.

महागाव तालुक्यातून फॅशन क्षेत्रात पुढे आलेल्या विशाल डहाळे यांच्या या कार्याची यवतमाळ जिल्ह्यात चर्चा होत असून, 'मिस अँड मिसेस किड्स विदर्भ २०२६' या आगामी कार्यक्रमाकडे अनेकांचे लक्ष लागले आहे.

## १७ वे कामगार भजन प्रशिक्षण शिबिराचे आज उद्घाटन

### महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे राज्यस्तरीय भजन प्रशिक्षण

**परळी (प्रतिनिधी)**

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळातर्फे राज्यस्तरीय कामगार भजन प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या भजन प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन आज देवगड येथील श्री समर्थ सद्गुरू किसनगिरी बाबा सेवकाश्रम येथे मान्यवरांच्या हस्ते होणार आहे. हे भजन प्रशिक्षण २६ ते २८ ऑक्टोबर दरम्यान होणार असून यामध्ये कामगारांना भजन, कीर्तन व पारंपारिक संगीताचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. भजन प्रशिक्षण शिबिराचे उद्घाटन आज सकाळी दहा वाजता राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या हस्ते होणार असून अध्यक्ष म्हणून खासदार भाऊसाहेब वाघचौरे यांची उपस्थिती राहणार आहे. तर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार विठ्ठलराव लंघे व ज्ञानेश्वरी साखर कारखान्याचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र घुले हे आहे. विशेष अतिथी म्हणून कामगार उपसचिव रोशनी कदम पाटील व सेवकाश्रमचे प्रमुख भास्करगिरी महाराज यांची उपस्थिती राहणार आहे. या शिबिरात राज्यातील २०० अधिक कामगार सहभागी होणार आहे. शिबिर संचालक ह.भ.प. कृष्णा महाराज उगले यांच्यासह इतर पाच भजनाचार्य कामगारांना भजनाचे प्रशिक्षण देणार आहे. शिबिर यशस्वी होण्यासाठी प्र. कल्याण आयुक्त नंदलाल राठोड व प्र. सहाय्यक कल्याण आयुक्त भावना बच्छाव परिश्रम घेत आहे.

## मुंबई उच्च न्यायालयाने आयकर विभागाची पुनर्मूल्यांकनाची कारवाई रद्द केली; अ‍ॅड. अर्णव कऱ्हाड यांचा वकिलांच्या समूहात सहभाग

**दापोली** : मुंबई उच्च न्यायालयात प्रयास गोयल विरुद्ध आयकर विभाग या प्रकरणात अ‍ॅड. अर्णव कऱ्हाड यांचा याचिकाकर्त्याच्या वतीने काम करणाऱ्या वकिलांच्या समूहात समावेश होता. या प्रकरणात न्यायालयाने आयकर विभागाने सुरू केलेली पुनर्मूल्यांकनाची कारवाई रद्द केली.

प्रयास गोयल यांनी कॉनकॉर्ड एन्व्हायरो सिस्टिम्स प्रा. लि. या कंपनीचे समभाग विकले होते. या व्यवहारातून झालेल्या भांडवली नफ्यावर त्यांनी आयकर कायद्याच्या कलम ५४एफ अंतर्गत करसवलतीचा दावा केला होता. आयकर विभागाने व्यवहाराच्या मूल्यांकनाबाबत शंका उपस्थित करून पूर्वीचे मूल्यांकन पुन्हा उघडण्याची प्रक्रिया सुरू केली होती. या कारवाईला गोयल यांनी मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले.

याचिकाकर्त्याच्या वतीने अ‍ॅड. शाम व्ही. वाळवे यांच्यासह अ‍ॅड. तेजवीर सिंग, अ‍ॅड. भाविक छेडा आणि अ‍ॅड. अर्णव कऱ्हाड यांनी काम केले. न्यायालयाने नमूद केले की, संबंधित व्यवहार आणि करसवलतीच्या पात्रतेबाबत मूळ मूल्यांकनादरम्यान चौकशी झाली होती. करदात्याने आवश्यक माहिती व स्पष्टीकरण दिल्यानंतर आयकर अधिकाऱ्यांनी २०१९ मध्ये मूल्यांकन पूर्ण केले होते. त्यामुळे आधी तपासलेल्या मुद्द्यांवर केवळ मतपरिवर्तनाच्या आधारे पुनर्मूल्यांकनाची कारवाई करता येणार नाही.

न्यायमूर्ती बी. पी. कोलाबावाला आणि न्यायमूर्ती फरहान पी. दुबाश यांच्या खंडपीठाने ८ सप्टेंबर २०२६ रोजी दिलेल्या निर्णयात पुनर्मूल्यांकनाशी संबंधित कारणे दाखवा नोटीस, आदेश आणि त्यानंतरची नोटीस रद्द केली. या निर्णयातून आधी तपासलेल्या करव्यवहाराबाबत पुनर्मूल्यांकन करताना आयकर विभागाने कायदेशीर निकषांचे पालन करणे आवश्यक असल्याचे स्पष्ट झाले.

अ‍ॅड. अर्णव कऱ्हाड यांनी मुंबईच्या गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमधून कायद्याचे शिक्षण पूर्ण केले आहे. वकिली व्यवसायाच्या सुरुवातीच्या टप्प्यात मुंबई उच्च न्यायालयातील या प्रकरणाशी त्यांचे नाव जोडले गेले आहे. न्यायालयीन कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव त्यांच्या पुढील व्यावसायिक वाटचालीच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. प्राचार्य डॉ. भारत द. कऱ्हाड यांचे ते सुपुत्र आहेत.



## दुष्काळाने शेती गेली, आता रोजगार हमीचा आधार तरी द्यावा!

### मोखाड्यातील दुष्काळग्रस्त शेतकरी व मजुरांची प्रशासनाकडे मागणी; रोजगार हमीची कामे तातडीने सुरू करण्याची गरज

**जव्हार (वा.)**

पालघर जिल्ह्यातील मोखाडा तालुक्यात पावसाने दिलेली उघडीप आणि वाढत्या उन्हाच्या तडाख्यामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेली पिके करपली आहेत. भात आणि नागली ही दैनंदिन आहारातील प्रमुख पिके दाण्यावर येण्याच्या अवस्थेत असतानाच सुकल्याने अनेक शेतांमध्ये धान्याऐवजी केवळ पेंढा शिल्लक राहिला आहे. वर्षभराच्या उदरनिर्वाहाचा मुख्य आधार असलेली खरीप शेतीच उद्ध्वस्त झाल्याने शेतकरी आणि शेतमजुरांसमोर आर्थिक संकट उभे ठाकले आहे. अशा परिस्थितीत कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करायचा, असा प्रश्न निर्माण झाला असून, दुष्काळग्रस्त भागात रोजगार हमीची कामे तातडीने सुरू करून आर्थिक आधार द्यावा, अशी मागणी शेतकरी व मजुरांकडून होत आहे.

तालुक्यातील अनेक गाव-पाड्यांमध्ये शेतीची कामे ठप्प झाली आहेत. हाताला काम नाही आणि घरात खायला धान्य नाही, अशी परिस्थिती निर्माण होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांचे उत्पन्न घटले आहे. दुसरीकडे, शेतीवर मजुरी करून उदरनिर्वाह करणाऱ्या आदिवासी कुटुंबांनाही रोजगार मिळणे कठीण झाले आहे. त्यामुळे शासनाकडून तातडीने मदत मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



**■ शेती गेली, रोजगारही नाही; स्थलांतराचे संकट**

मोखाडा तालुक्यातील ग्रामीण आणि अतिदुर्गम भागातील नागरिकांचा उदरनिर्वाह प्रामुख्याने शेती व शेतीपूरक मजुरीवर अवलंबून आहे. मात्र, पावसाच्या खंडामुळे आणि उन्हाच्या तीव्रतेमुळे पिकांचे नुकसान झाल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला आहे. अशा वेळी रोजगार हमी योजनेची कामे सुरू नसल्यास मजुरांना रोजगाराच्या शोधात गाव सोडून शहरांकडे स्थलांतर करावे लागण्याची शक्यता आहे.

त्यामुळे शासनाने केवळ अन्नधान्य आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करून न थांबता, स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देण्याची गरज आहे. जनावरांसाठी चारा व पाण्याची व्यवस्था करण्याबरोबरच शेतकरी आणि शेतमजुरांच्या हाताला काम मिळेल, असे नियोजन करणे आवश्यक आहे.

**■ जलसंधारणाच्या कामांतून रोजगार आणि पाणीसाठ्यात वाढ शक्य**

दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी रोजगार हमी योजनेअंतर्गत विविध विकासकामे हाती घेता येऊ शकतात. कृषी विभाग, वनविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पंचायत समिती आणि जलसंधारण विभागाच्या माध्यमातून बंधारे बांधणे, नाल्यांचे खोलीकरण करणे, गाळ काढणे, मृद व दगडी बांध घालणे, ग्रामीण रस्त्यांची कामे तसेच वैयक्तिक फळबाग लागवड यांसारखी कामे सुरू केल्यास स्थानिक मजुरांना रोजगार उपलब्ध होऊ शकतो.

या कामांमुळे नागरिकांना तातडीने आर्थिक आधार मिळण्यासोबतच भविष्यात पावसाचे पाणी अडवणे, भूजलपातळी वाढवणे आणि शेतीसाठी पाण्याची उपलब्धता सुधारणे शक्य होणार आहे. त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर गाव-पाड्यांतील कामांची मागणी नोंदवून त्यानुसार तातडीने नियोजन करण्याची गरज आहे.

**■ प्रशासनाने तातडीने कामे सुरू करावीत**

दुष्काळाची तीव्रता लक्षात घेता संबंधित यंत्रणांनी संभाव्य कामांची यादी तयार करून आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करावी आणि मजुरांना त्वरित काम उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी होत आहे. रोजगार हमीची कामे गावातच सुरू झाल्यास आदिवासी मजुरांना रोजगारासाठी स्थलांतर करण्याची वेळ येणार नाही. त्यामुळे प्रशासनाने दुष्काळग्रस्त परिस्थितीचे गांभीर्य ओळखून रोजगार, अन्नधान्य, पिण्याचे पाणी आणि जनावरांच्या चाऱ्याबाबत ठोस उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा शेतकरी व मजूर व्यक्त करीत आहेत.

**■ तहसीलदार रोहन शिंदे यांची प्रतिक्रिया**

"व्हीबी-जी रामजी योजनेंतर्गत प्रत्येक गाव-पाड्यावर स्थानिक ठिकाणी विविध प्रशासकीय विभागांमार्फत नागरिकांना लवकरच रोजगार उपलब्ध करून देण्यात येणार आहे. संबंधित यंत्रणांना कामे सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. तसेच अन्नधान्य, पाणीटंचाई आणि गाई-गुरांसाठी चारा यांसह दुष्काळात भेडसावणाऱ्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी प्रशासन सज्ज आहे."